लोकसभा निवडणुकीचे निकाल स्पष्ट झाल्यानंतर सत्तास्थापनेसाठीच्या हालचालींना वेग आला आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या निवासस्थानी आज मंत्रिमंडळाची बैठक झाली. केंद्रीय मंत्री अमित शहा, नितिन गडकरी आणि राजनाथ सिंह आणि इतर या बैठकीला उपस्थित होते. या बैठकीनंतर प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी राष्ट्रपती भवनात राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांची भेट घेतली आणि प्रधानमंत्रीपदाचा, तसंच केंद्रीय मंत्रिमंडळाचा राजीनामा राष्ट्रपतींकडे सुपूर्द केला. तसंच १७वी लोकसभा विसर्जित करण्याची शिफारस केली. राष्ट्रपतींनी मोदी यांचा राजीनामा स्वीकारला, आणि नवं सरकार स्थापन होईपर्यंत पदभार सांभाळण्याची विनंती त्यांनी केली.

इंडिया आघाडीची बैठकही आज संध्याकाळी नवी दिल्लीत होणार आहे. निवडणुकीचे निकाल आणि नंतरची रणनीती यावर या बैठकीत चर्चा होणार असल्याचं काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांनी समाज माध्यमावरच्या पोस्टमध्ये म्हटलं आहे.

**<><><><><>**

भाजपाच्या नेतृत्वाखालच्या एनडीए आघाडीच्या खासदारांची बैठक येत्या शुक्रवारी नवी दिल्ली इथं होण्याची शक्यता आहे. भाजपा, टीडीपी, जदयू, एलजेपी, शिवसेना आणि एनडीए च्या इतर घटक पक्षांचे नवनियुक्त खासदार या बैठकीला उपस्थित राहतील.

**<><><><><>**

लोकसभा निवडणुकीत राष्ट्रीय लोकशाही आघाडीने **५४३** पैकी **२९२** जागा जिंकून बहुमत मिळवलं आहे. तर इंडिया आघाडीला **२३३** जागांवर यश मिळालं आहे. गेल्या लोकसभा निवडणुकीच्या तुलनेत भाजपा आणि रालोआच्या जागा कमी झाल्या आहेत, तर काँग्रेस आणि इंडिया आघाडीच्या जागांमध्ये वाढ झाली आहे.

२४० जागा जिंकून भाजपा सर्वात मोठा पक्ष ठरला आहे. तर काँग्रेसने ९९ जागांवर विजय मिळवला आहे. समाजवादी पक्षाने ३७, तृणमूल काँग्रेसने २९, द्रमुक २२, तेलुगु देसम १६, जेडीयू १२, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाने ९, राष्ट्रवादी काँग्रेस शरच्चंद्र पवार पक्षाने ८, राजद ४, आम आदमी पक्ष ३ तर मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाने ४ जागांवर विजय मिळवला आहे.

<><><><><>

राज्यातल्या लोकसभेच्या सर्व ४८ जागांचे निकाल जाहिर झाले असून महाविकास आघाडीला ३० तर महायुतीला १७ जागा मिळाल्या आहेत. काँग्रेसनं सर्वात जास्त १३ जागांवर विजय मिळवला असून भाजपा ९, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष ९, राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्ष ८, शिवसेना ७ आणि राष्ट्रवादी काँग्रेसनं एका जागेवर विजय मिळवला. सांगलीत अपक्ष उमेदवार विशाल पाटील विजयी झाले आहेत.

<><><><><>

लोकसभा निवडणुकीत राज्यात भाजपाच्या पराभवाची जबाबदारी आपण घेत असून, आता पक्षात पूर्णवेळ काम करण्यासाठी उपमुख्यमंत्रीपदाच्या जबाबदारीतून आपल्याला मुक्त करावं, अशी विनंती आपण पक्ष नेतृत्वाला करणार आहोत, असं उपमुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी सांगितलं आहे. लोकसभा निवडणुकीच्या निकालाच्या पार्श्वभूमीवर ते आज मुंबईत बातमीदारांशी बोलत होते.

सत्तेत आल्यानंतर भाजपा संविधान बदलेल असा प्रचार विरोधकांनी केला. या प्रचाराला प्रत्युत्तर देण्यात आपण कमी पडलो, असं फडनवीस म्हणाले. शेतकऱ्यांचे प्रश्न, मराठा आरक्षण, अल्पसंख्यक समुदायात असुरक्षिततेची भावना या गोष्टीही आपल्या पराभवाला कारण ठरल्याचं ते म्हणाले. दरम्यान, देवेंद्र फडनवीस यांनी सरकारच्या बाहेर पडून काम करण्याची गरज नाही. त्यांनी सरकारमध्ये राहूनच संघटनेला मदत करावी, अशी विनंती आपण फडनवीस आणि केंद्रीय

नेतृत्वालाही करणार असल्याचं भाजपा प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी वार्ताहर परिषदेत बोलताना सांगितलं आहे.

<><><><><>

विधान परिषदेच्या कोकण पदवीधर मतदारसंघासाठी काँग्रेसनं रमेश कीर यांना उमेदवारी दिल्याचं काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी आज सांगितलं.

मुंबई पदवीधर मतदारसंघासाठी शिवसेनेचे अधिकृत उमेदवार म्हणून दीपक सावंत यांनी आज उमेदवारी अर्ज भरला.

मुंबई शिक्षक मतदार संघासाठी भाजपानं शिक्षक परिषदेचे उमेदवार शिवनाथ दराडे यांना पाठिंबा दिल्याची घोषणा प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी आज केली.

<><><><><>

देशाच्या शेअर बाजारातल्या कालच्या घसरणीला आज थांबवत आज मोठी तेजी नोंदवली. व्यवहार सुरू झाले तेव्हा थोड्याफार प्रमाणात घसरलेल्या शेअर बाजारांनी नंतर तेजीचा रस्ता पकडला आणि दिवसअखेरपर्यंत त्यात वाढच होत गेली. व्यवहार संपले तेव्हा सेन्सेक्स २ हजार ३०३ अंकांची तेजी नोंदवून ७४ हजार ३८२ स्थिरावला. निफ्टी ७३६ अंकांची वाढ नोंदवत २२ हजार ६२० अंकांवर बंद झाला. निफ्टी बँकही २ हजार १२६ अंकांची वाढ नोंदवून ४९ हजाराच्यावर बंद झाला.

<><><><><>

नैऋत्य मोसमी पावसाच्या पुढल्या वाटचालीसाठी परिस्थिती अनुकूल असून, येत्या  ३ ते ४ दिवसांत मध्य अरबी समुद्र आणि कर्नाटकाचा उर्वरित भाग, दक्षिण महाराष्ट्र, तेलंगणा, आंध्रप्रदेशचा किनारपट्टी भाग, छत्तीसगड, ओदिशा, पश्चिम मध्य आणि वायव्य बंगालच्या उपसागराच्या आणखी काही भागात तो पुढे सरकेल असा हवामान विभागाचा अंदाज आहे.

देशाच्या वायव्य भागात पुढले ४ ते ५ दिवस जोरदार वारे आणि मेघगर्जनेसह पावसाची शक्यता असून, या काळात वायव्य आणि पूर्व भारतातली उष्णतेची लाट कायम राहील, मात्र त्याचा प्रभाव ओसरेल असा हवामान विभागाचा अंदाज आहे.

//<><><><><>//